नि. दि.दावा क्र. ०५/२०१०
रामकृष्ण......वि... सचिव ग्रा.पं. सांगवी

## निशाणी १२१ वर आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी तर्फे पुरावा बंद चा आदेश बाजुला सारुन पुढील सरतपासणी घेण्यास परवानगी मिळणे बाबत दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जा असे कथन केले आहे की, प्रतिवादी/साक्षीदार हे मागील तारखेवर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद अकोला यांच्या समोर सुनावणी कामी गेले होते त्यामुळे ते न्यायालयात हजर राहु शकले नाही. त्यामुळे पुरावा बंदचा आदेश बाजुला सारुन पुढील सरतपास देण्याची परवानगी मिळावी याकरीता अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे. वादी तर्फे त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन प्रखर विरोध केलेला आहे.

३. अर्ज व म्हणणे पाहिले. रोजनामा तसेच प्रकरणाचा अभिलेख तपासला. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जाच्या अनुशंगाने अभिलेख तपासला असता असे दिसुन येत आहे की, सदर प्रकरण सन २०१० मध्ये दाखल झालेले असुन प्रतिवादीच्या पुराव्या करीता प्रलंबित आहे. प्रतिवादी तर्फे साक्षीदार रविंद्र इंगळे यांनी नि.क्र. ११३ नुसार त्यांचा पुराव्याचा प्रतिज्ञालेख दि. २१.०४.२०२३ रोजी दाखल केलेला आहे. त्यानंतर दि. १७.०६.२०२३ रोजी सदर साक्षीदाराचा पुढील सरतपास सुरु करुन ग्रामपंचायतचे मुळ रजिस्टर आणले नसल्यामुळे पुढील सरतपास प्रतिवादीच्या विधीज्ञांच्या विनंतीवरुन तहकुब करण्यात आला होता. त्यानंतर दि.१५.०९.२०२३ दि. ०६.१०.२०२३ इत्यादी तारखांना सदर साक्षीदाराने तहकुबीचा अर्ज दाखल केलेला होता. प्रकरण जुने असल्यामुळे दि. ०६.१०.२०२३ रोजीचा अर्ज नि.क्र.१२० नामंजुर करण्यात आला होता. प्रतिवादीला संधी देवुनही पुरावा दाखल न केल्यामुळे नि.क्र.१२० आणि नि.क्र.१ अन्वये पुरावा बंद करण्यात आला होता.

५.		अर्जामध्ये नमुद केलेले कारण रास्त जरी असले तरी सदर प्रकरण जुने असल्यामुळे लवकरात लवकर निकाली काढण्यााठी प्रतिवादीने त्यांच्या पुरावा देणे आवश्यक आहे. प्रकरण गुणदोषावर निकाली काढण्यासाठी दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गीक न्याय तत्वाचे पालन करण्यासाठी खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**: आ दे श :**

१.	प्रस्तुत अर्ज खर्च रक्कम रुपये ३००/– ला अधीन राहुन मंजुर करण्यात येत आहे. सदर रक्कम वादीला देण्यात यावी.

२.	नि.क्र.१२० व नि.क्र.१ अन्वये करण्यात आलेला पुरावा बंद करण्याचा आदेश मागे घेण्यात येत आहे.

( विष्णु द. गिते)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.

दिनांक : १३/१०/२०२३.
ठिकाणः बाळापूर